ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १९ • शुक्रवार दि.९ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## मेट्रो-रेल्वे बंद करुन जनतेला वेठीस का धरता ?

### सीजेपी आंदोलना दरम्यान मेट्रो रेल्वे बंद निर्णयावर 'सुप्रिम'ताशेरे




नवी दिल्ली: सीजेपीच्या वतीने केंद्रीय निवडणूक आयोगाविरुद्ध होणाऱ्या आंदोलनाचा धसका घेऊन सार्वजनिक वाहतूक बंद करणार असाल, तर सर्वसामान्य नागरिकांनी जायचे कुठे? दिल्लीतील नियोजित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मेट्रो आणि रेल्वे सेवा बंद करण्याच्या निर्णयावरून सर्वोच्च न्यायालयाने सरकारला थेट सवाल केला. आंदोलन रोखण्याच्या नावाखाली जनतेची गैरसोय का केली जात आहे, असा सवाल उपस्थित करत न्यायालयाने सार्वजनिक वाहतूक बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. त्यामुळे सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीकडून १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत आंदोलन आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मेट्रो आणि रेल्वे सेवा बंद करण्याच्या प्रस्तावाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.मेट्रो आणि रेल्वे बंद का केल्या? असा थेट सवाल न्यायालयाने उपस्थित केला. आंदोलनामुळे संभाव्य गर्दी आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो; मात्र त्यासाठी सार्वजनिक वाहतूकच बंद करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला. मेट्रोने प्रवास करणारे ज्येष्ठ नागरिक, नोकरदार, विद्यार्थी आणि अन्य प्रवाशांच्या गैरसोयीबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त केली. कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारची असली, तरी त्याचा फटका सामान्य नागरिकांना बसता कामा नये, असा स्पष्ट संदेश न्यायालयाच्या निरीक्षणातून देण्यात आला. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सरकारच्या निर्णयावर जोरदार आक्षेप घेतला. यापूर्वीही मेट्रो सेवा बंद करण्यात आली होती. आता ५७ मेट्रो स्थानके बंद करण्याचा प्रस्ताव असल्याने लाखो पान ४ वर

## शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाणाच्या मालकीचा दिवाळीपूर्वी फैसला?

नवी दिल्ली:शिवसेनेतील फुटीनंतर सुरू झालेल्या पक्ष आणि चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू असून, ही सुनावणी ३० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे संकेत न्यायालयाने दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने हा निकाल अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.




शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह नेमके कोणाचे, याचा फैसला दिवाळीपूर्वी होणार का, याकडे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील आमदारांसह बंड केल्यानंतर पक्षात उभी फूट पडली. त्यानंतर पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह आणि पक्षावरील अधिकार यांवरून ठाकरे गट आणि शिंदे गट यांच्यात संघर्ष सुरू झाला. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह दिल्यानंतर ठाकरे गटाने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. तेव्हापासून या प्रकरणातील न्यायालयीन लढाईकडे राज्याचे लक्ष पान ४ वर

## मौजे दहेगाव (ची) येथील अंगणवाडी सेविका भरतीत गैरप्रकार

### न्यायासाठी आदिवासी महिलेचे उपोषण

नांदेड/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील मौजे दहेगाव (ची) येथील अंगणवाडी सेविका भरती प्रक्रियेत गैरप्रकार झाला आहे. गैरप्रकार करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करावी या मागणीसाठी आदिवासी महिला कांचन किशन वानोळे हिने गेल्या पाच दिवसांपासून जि.प.कार्यालयासमोर आमरण उपोषण केले आहे.

जि.प.च्या सीईओंना दिलेल्या निवेदनात सौ.कांचन वानोळे हिने अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. अंगणवाडी सेविका भरती प्रक्रिया सन २०२५ च्या महिला व बालविकास प्रकल्प किनवट कार्यालयाकडून सौ.कांचन किशन वानोळे रा.दहेगाव (ची) या महिलेची अंगणवाडी सेविका म्हणून लेखी स्वरुपात नियुक्ती करण्यात आली होती. कार्यालयाच्या आदेशावरुन दहेगाव येथे सतत दहा महिने अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत होते. त्या बदल्यात आठ महिन्यांचे मानधन शासनाकडून मला मिळाले आहे. दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी कुठल्याही प्रकारची तोंडी किंवा लेखी सुचना न देता अंगणवाडी सेविका पदावरुन कमी केले. आणि माझ्या जागी पल्लवी शंकर टारपे या महिलेची गैरमार्गाने व नियमबाह्यरित्या नियुक्ती केली आहे. सदर महिला ही गोकुंदा येथे वास्तव्यास असून तीच्याकडे दहेगाव (ची) येथील रहिवाशी असल्याचा कोणताही पुरावा नाही. अंगणवाडी सेविका भरती प्रक्रियेत पल्लवी शंकर टारपे हिने अनुसुचित जमाती प्रवर्गातून अर्ज केला होता. त्यांना अनुसुचित जमाती प्रवर्गाचे प्रथम यादीत पाच गुण देण्यात आले. त्यानंतर अर्ज भरण्याची तारीख संपल्यानंतर पल्लवी टारपे हिने एनटी प्रवर्गातून अर्ज दाखल केला आहे. पल्लवी टारपे या महिलेने मतदान कार्डाच्या एक आयडीवर तीन बोगस मतदान कार्ड तयार केले आहे. तीचे दहेगाव येथील मतदार यादीमध्ये नाव सुध्दा नाही. पल्लवी टारपे हि दहेगाव (ची) येथील रहिवाशी नसल्याबाबत सरपंच, पोलीस पाटील यांच्यासह ९४ नागरिकांनी स्वाक्षरी करुन प्रकल्प अधिकारी, किनवट यांना निवेदन दिले. जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री.थोरात, प्रकल्प अधिकारी श्री.जोमादे यांनी सारीका डांगे यांच्यामार्फत पैशाची मागणी केली आहे. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करावी व दहेगाव (ची) येथील नियमबाह्यरित्या अंगणवाडी सेविकेची केलेली नियुक्ती रद्द करुन माझी फेरनियुक्ती करावी. अशी मागणी करण्यात आली. सदरील मागणीसाठी सौ.कांचन किशन वानोळे या आदिवासी महिलेने दि.५ ऑक्टोबर पासून जि.प.कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले. गुरुवारी सदरील महिलेची प्रकृती बिघडल्याने तीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर तीने पुन्हा उपोषण सुरु केले आहे. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देवून कांचन वानोळे यांना पाठिंबा दिला आहे.

### भारतीय वंशाच्या नवी पिल्लै यांना नोबेल पुरस्कार

नवी दिल्ली:दक्षिण आफ्रिकेतील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी मानवी हक्क उच्चायुक्त नवनीतम नवी पिल्लै यांना २०२६ चा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. शांतता आणि आंतरराष्ट्रीय कायद्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी केलेल्या दीर्घकालीन कार्याची दखल घेत नॉर्वेच्या नोबेल समितीने शुक्रवारी (९ ऑक्टोबर) या पुरस्काराची घोषणा केली. युद्धगुन्हे, मानवतेविरुद्धचे गुन्हे आणि नरसंहार पान ४ वर




वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी घोषीत करण्यात आलेल्या स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी आज महाराष्ट्र वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने राज्यव्यापी आंदोलनानिमित्त नांदेड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर सहकुटुंब प्रचंड मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देतांना राज्य उपाध्यक्ष बालाजी पवार, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, गणेश वडगावकर, ज्येष्ठ संपादक शंतनु डोईफोडे, गोवर्धन बियाणी, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे, ॲड.कॉ.प्रदीप नागापूरकर आदी दिसत आहेत.

## शेतात गांजाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-दिग्रस (बु.) ता.कंधार शिवारातील शेतात गांजाची लागवड करणाऱ्या एका शेतकऱ्या विरुध्द कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिग्रस (बु.) शिवारातील श्रीकृष्ण रामराव गुट्टे रा.भेंडेवाडी ता.कंधार यांनी आपल्या शेतातील कापुस व तुरीच्या पिकांमध्ये आंतर पिक म्हणून गांजाची लागवड केल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पोलीस निरीक्षक घोडके, सपोनी रवी वाहुळे, फौजदार बळीराम दासरे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच पंच व राजपत्रीत अधिकारी यांच्यासह श्रीकृष्ण गुट्टे यांच्या शेतावर छापा टाकला. यावेळी कापुस व तुरीच्या पिकांच्या लागवडीमध्ये अमली पदार्थ असलेल्या गांजा वनस्पतीची



लागवड केल्याचे आढळून आले. पोलीसांनी पंचासमक्ष ५ लाख २५ हजार रुपये किंमतीचा साडेदहा किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात श्रीकृष्ण गुट्टे याच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अतिरिक्त जलसाठा असलेल्या जलाशयांवरील शेतीपपांचा वीजपुरवठा खंडित करु नये-माजी आ.शंकरअण्णा धोंडगे




कंधार/प्रतिनिधी-चालू हंगामात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची भविष्यात टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने मानार प्रकल्पासह विविध जलाशयांवरील शेतीपंपांचा वीजपुरवठा सरसकट खंडित करून फौजदारी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, अतिरिक्त जलसाठा उपलब्ध असलेल्या जलाशयांवरील शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित करू नये. प्रशासनाचा हा निर्णय एकतर्फी आणि शेतकऱ्यांवर अन्याय करणारा आहे, अशी ठाम भूमिका शिवसेना शेतकरी परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार शेतकरी नेते शंकरअण्णा धोंडगे यांनी मांडली.

यंदा खरीप हंगामात कमी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा संकटाच्या परिस्थितीत जलाशयांच्या परिसरातील शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याच्या आधारावर हळद आणि ऊस यांसारखी पिके घेतली आहेत. या पिकांच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी मोठा भांडवली खर्च केला असून, ही पिके पुढील एक-दोन महिन्यांत काढणीला येणार आहेत. अशा निर्णायक टप्प्यावर शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित केल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने कोणताही निर्णय घेताना शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करावा, असे धोंडगे यांनी सांगितले. ऊर्ध्व मानार, मानार आणि विष्णुपुरी या जलाशयांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा, पिण्याच्या पाण्यासाठीचे आरक्षण, बाष्पीभवनामुळे होणारी पाण्याची घट आणि भविष्यातील पाण्याची गरज यांचा सविस्तर लेखाजोखा घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच अतिरिक्त जलसाठा उपलब्ध असलेल्या जलाशयांवरील उभ्या पिकांना सिंचनासाठी पाणी देण्याबाबत स्वतंत्र वर्गीकरण करावे, अशी मागणी धोंडगे यांनी केली. पिण्याच्या पाण्याचे कारण पुढे करून सर्वच जलाशयांवरील शेतीपंपांचा वीजपुरवठा सरसकट खंडित करणे योग्य नाही. शेतकरी हे जबाबदार नागरिक आहेत; त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणून पाहू नये. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन न्याय्य भूमिका घ्यावी. अन्यथा, चुकीच्या प्रशासकीय निर्णयाविरोधात वेळ पडल्यास न्यायालयात जाणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. दि.९ ऑक्टोबर रोजी कंधारचे तहसीलदार यांना निवेदन देऊन धोंडगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. तसेच पत्रकार परिषदेतून प्रशासनाला शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याचे आवाहन केले. यापूर्वी दि.८ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी, नांदेड यांनाही यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडेही अतिरिक्त जलसाठा असलेल्या जलाशयांवरील सिंचनाचा प्रश्न मांडण्यात आला आहे. यावेळी शिवसेना शेतकरी परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे, कंधार शहराध्यक्ष रहीमभाई खान गौस शेख, नारायण मेकलवाड, माधव गंदलपवाड, शेख आवेश आणि संतोष कागणे उपस्थित होते.

# मेहनत जनतेची,मस्ती सत्तेची!

**लोकशाहीत जनता सर्वोच्च असते, असे प्रत्येक राजकीय पक्ष सांगतो. निवडणुकीच्या काळात जनतेच्या दारात जाणारे लोकप्रतिनिधी सत्तेत आल्यानंतर मात्र जनतेलाच आपल्या दारात उभे करतात. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत प्रश्नांसाठी नागरिकांना संघर्ष करावा लागत असेल, तर लोकशाहीच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. जनतेच्या प्रश्नांपासून विद्यार्थ्यांच्या भविष्यापर्यंत प्रशासनाचे उत्तरदायित्व आज ऐरणीवर आले आहे.नीट परीक्षेतील पेपरफुटीचे प्रकरण आणि विविध स्पर्धा व भरती परीक्षांतील गैरप्रकारांच्या तक्रारींनी परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. यूपीएससीसारख्या प्रतिष्ठित परीक्षांबाबतही पारदर्शकता आणि सुरक्षिततेचा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची कसोटी असते. प्रश्नपत्रिकेच्या गोपनीयतेवरच प्रश्न निर्माण झाले, तर गुणवत्तेच्या बळावर भविष्य घडविण्याच्या संकल्पनेचे काय होणार? वर्षानुवर्षे अभ्यास करणारे विद्यार्थी, त्यांच्या शिक्षणासाठी कर्ज काढणारे पालक आणि मुलांच्या यशासाठी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवणारी कुटुंबे यांचे स्वप्न एका परीक्षेवर अवलंबून असते. अशा वेळी गैरप्रकारांच्या आरोपांमुळे परीक्षा रद्द झाली किंवा भरती रखडली, तर त्याची किंमत विद्यार्थ्यांनीच का मोजावी? त्यांचे वय, पैसा आणि मौल्यवान वेळ परत कोण देणार? प्रत्येक आरोप म्हणजे गुन्हा सिद्ध झाला असे नाही. त्यामुळे निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे. परंतु चौकशीच्या नावाखाली प्रकरणे लांबविणेही तितकेच चुकीचे आहे. गैरप्रकार सिद्ध झाल्यास दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. प्रश्नपत्रिकांची सुरक्षितता, परीक्षा केंद्रांवरील नियंत्रण आणि तक्रारींचे त्वरित निवारण यासाठी सरकारने ठोस व्यवस्था उभी केली पाहिजे. केवळ चौकशीचे आदेश आणि कारवाईची आश्वासने देऊन जबाबदारी संपत नाही.महागाई, बेरोजगारी आणि शिक्षणाचा वाढता खर्च यामुळे सामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. नोकरीसाठी तरुणांना वारंवार परीक्षा द्याव्या लागतात; पण भरतीतील विलंब आणि गैरप्रकारांच्या तक्रारी त्यांच्या संघर्षात भर घालतात. दुसरीकडे, विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. मग या विकासाचा प्रत्यक्ष लाभ सामान्य माणसाला किती मिळतो, याचा हिशेब मागण्याचा अधिकार जनतेला नाही काय? प्रशासनातील त्रुटी दाखवून देणे म्हणजे व्यवस्थेला बदनाम करणे नव्हे. प्रश्न विचारणाऱ्यांना दोष देण्यापेक्षा प्रश्न निर्माण का झाले, याचे उत्तर देणे महत्त्वाचे आहे. चुका मान्य करून त्या दुरुस्त करणे, हीच सक्षम प्रशासनाची ओळख असते.नांदेडसह अनेक शहरांमध्ये पाणी, रस्ते आणि स्वच्छतेसाठी नागरिकांना तक्रारी कराव्या लागतात. दिव्यांग नागरिकांनाही आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करावे लागत असेल, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित होतो. मूलभूत सुविधा पुरविणे ही सरकारची मेहेरबानी नाही, तर कर्तव्य आहे. लोकप्रतिनिधींनी जनतेला उत्तर दिले पाहिजे आणि अधिकाऱ्यांनी आपल्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्याची कसोटी भाषणे, जाहिराती आणि आश्वासनांवर नव्हे, तर जनतेच्या आयुष्यात झालेल्या बदलांवर ठरते. विद्यार्थ्यांना निष्पक्ष परीक्षा, बेरोजगारांना पारदर्शक भरती, शेतकऱ्यांना योग्य मदत आणि नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे, ही सुशासनाची किमान अपेक्षा आहे.जनता केवळ मतदान करणारी यंत्रणा नाही. ती कर भरते, देशाच्या विकासात योगदान देते आणि लोकप्रतिनिधींना सत्ता बहाल करते. त्यामुळे प्रत्येक हक्कासाठी तिला कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणे किंवा रस्त्यावर उतरावे लागणे, ही लोकशाहीची शोकांतिका आहे. मग प्रश्न स्पष्ट आहे, जनता मालक आहे की सत्ताधाऱ्यांच्या दारात न्याय मागणारी याचक? निवडणुका जिंकणे हा लोकप्रतिनिधींचा अधिकार असू शकतो; पण जनतेच्या प्रश्नांना उत्तरे देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. पेपरफुटीचे प्रकरण असो किंवा प्रशासकीय अनागोंदी, प्रत्येक ठिकाणी जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. अन्यथा चेहरे बदलतील, आश्वासने बदलतील, सत्तेची समीकरणे बदलतील; पण सामान्य माणसाच्या वाट्याला येणारा संघर्ष कायम राहील. लोकशाहीची खरी ताकद सत्ताधाऱ्यांच्या अधिकारात नसते, तर जनतेला न्याय देण्याच्या त्यांच्या प्रामाणिकपणात असते. ही जाणीव सत्ताधाऱ्यांना कधी होणार,हाच आजचा खरा सवाल आहे.**

# हमने सनम को खत लिखा, आज जागतिक टपाल दिन!




'हमने सनम को खत लिखा' आठवते ना! साधारण १९८२ मध्ये आलेल्या शक्ती चित्रपटातील हे गाणं. अमिताभ आणि स्मिता पाटील यांच्यावर चित्रित झालेलं आनंद बक्षी यांनी कल्पकतेने लिहिलेलं आणि आर. डी. यांनी अजरामर केलेलं हे गाणं ज्यांनी त्या काळात पत्रं लिहिली असतील आणि ज्यांच्या पत्राचं उत्तरच कधी मिळालं नसेल त्यांना या पत्रातल्या या ओळी अवघ्या आयुष्याची शिदोरी होऊन गेल्या आहेत.

**पीपल का ये पत्ता नहीं**
**काग़ज़ का ये टुकड़ा नहीं**
**इस दिल का ये अरमान है**
**इसमें हमारी जान है**

खरंच, पत्रावळीचा तो सुवर्णकाळ! केवळ ६०७० किलोमीटरवर असताना सुद्धा दळणवळणाची साधनं नसायची अगदी तालुक्याच्या गावाला जाणंसुद्धा न परवडणाऱ्या या काळात फक्त पत्रं सोबतीला होती त्यातली काही पत्रं अजूनही कपाटाच्या कोपऱ्यात जपून ठेवली आहेत अनेकांनी! त्यातला सुगंध गेला. अक्षरंही अस्पष्ट झाली मात्र भावना तशाच ओल्यागच्च अगदी नव्वदीतल्या. हे सगळं आठवायला कारण म्हणजे आज ९ ऑक्टोबर जागतिक टपाल दिन.

आज पन्नाशी ओलांडलेली पिढी या जादूची साक्षीदार आहे. काळ बदलला. मोबाईल आला, संदेश आले, छायाचित्रं क्षणात पोहोचू लागली. तरीही पत्राची जादू संपलेली नाही. कारण मोबाईलवरचा संदेश वाचला जातो; पण पत्र भावनांनी ओथंबलेलं असतं. ते कपाटात जरी जीर्ण झालं, तरी हृदयात मात्र वर्षानुवर्षं जपून ठेवलं जातं. मित्रांनो! आज ९ ऑक्टोबर जागतिक टपाल दिन. जगातील टपाल व्यवस्थेला एकत्र आणणाऱ्या सार्वत्रिक टपाल संघाची स्थापना ९ ऑक्टोबर १८७४ रोजी स्वित्झर्लंडमधील बर्न येथे झाली. पुढे १९६९ मध्ये ९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक टपाल दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. पण, ही झाली एक नोंद आपली पत्रावळी अनादी काळापासून सुरू आहे भाग्यश्रीने 'मैने प्यार किया 'मध्ये कबुतराला पत्र घेऊन कबूतर जा-जा केले होते. तेव्हा आमच्या मनात कबुतरंही पत्रं घेऊन जातात याबद्दल यत्किंचितही शंका नव्हती फक्त आमची जिंदगी हे शोधण्यात गेली की ते पत्र पाठवणारी नेमकी कोण होती ! बाकी आपली जिंदगी तर फक्त लिहिण्यात गेली.

**न जाने कौन थे वो लोग जिन के ख़त के जवाब आए,**
**हमारा क्या है, हम ने तो बस ख़त पर ख़त लिखे हैं**

बरं, ही झाली आपली चित्तरकथा तसेही माणसाने संदेश पाठवण्याची सुरुवात टपाल कार्यालयापासून केलेली नाही. प्राचीन काळात माणूसच संदेशवाहक होता. धूर, अग्नी, नगारे, ध्वज, घोडेस्वार आणि धावते दूत अशा अनेक माध्यमांतून निरोप पोहोचवले जात. प्राचीन इजिप्तपासून पर्शियाच्या राजमार्गापर्यंत आणि भारतातील प्राचीन राजवटींपर्यंत संदेशवहनाची स्वतःची व्यवस्था होती. भारतातही संदेशवाहकांची परंपरा प्राचीन आहे. अलाउद्दीन खिलजीच्या काळातील टपाल व्यवस्था, 'इब्न बतूता' या जागतिक पर्यटकाने केलेले तिचे वर्णन आणि शेरशाह सूरीने १५४१ मध्ये उभारलेली घोडेस्वार टपाल व्यवस्था हा आपल्या टपाल इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. पुढे ब्रिटिश काळात आधुनिक टपाल व्यवस्थेला आकार मिळाला. १७७४ मध्ये कलकत्ता येथे मुख्य टपाल कार्यालय सुरू झाले. त्यानंतर मद्रास आणि मुंबई येथेही टपाल कार्यालये सुरू झाली. १८५४ मध्ये टपाल खात्याचे एकसंध स्वरूप निर्माण झाले आणि भारतातील आधुनिक टपाल व्यवस्थेचा पाया अधिक मजबूत झाला. या प्रवासात टपाल तिकिटाची कहाणीही तितकीच रंजक आहे. जगातील पहिले चिकटवता येणारे टपाल तिकीट म्हणजे ब्रिटनचे पेनी ब्लॅक. १८४० मध्ये प्रसिद्ध झालेले हे तिकीट राणी व्हिक्टोरियाचे चित्र असलेले होते. टपालाच्या शुल्काची पद्धतच त्याने बदलून टाकली.

**प्रवीण टाके**
उपसंचालक,विभागीय माहिती कार्यालय,छत्रपती संभाजीनगर

भारतातील पहिले टपाल तिकीट म्हणून सिंध डाकचा उल्लेख केला जातो. १८५२ मध्ये सिंध प्रांतात ते वापरात आले. पुढे १८५४ मध्ये भारतासाठी नियमित टपाल तिकिटांची मालिका प्रसिद्ध झाली. टपाल तिकीट म्हणजे केवळ टपाल शुल्क भरल्याची खूण नव्हे; कालांतराने ते देशाचा इतिहास, संस्कृती, कला, व्यक्तिमत्त्वे आणि राष्ट्रीय स्मृती जपणारे छोटेसे दस्तऐवज बनले.त्या काळाने गावागावात असे 'फिलॅटली' बघितले आहे आणि त्यांची जिद्द ही अनुभवली आहे. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे, ऐतिहासिक घटनेचे, सांस्कृतिक वारशाचे किंवा राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयाचे स्मारक टपाल तिकीट काढण्याची प्रक्रियाही औपचारिक असते. संबंधित व्यक्ती किंवा संस्थेकडून प्रस्ताव येतो. त्याची छाननी केली जाते. तज्ज्ञ समितीच्या स्तरावर विचार होतो. सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतल्यानंतर तिकिटाची रचना, छपाई आणि प्रकाशनाची प्रक्रिया पूर्ण केली जाते. आणि मग येतो तो प्रतिष्ठेचा क्षणटपाल तिकीट प्रकाशन सोहळा! अशा अनेक सोहळ्यांना पत्रकार म्हणून उपस्थित राहता आले टपाल तिकिटावर मान्यवराचे चित्र आणि मग ते तिकीट चिकटविण्यासाठी पोस्टाच्या दारातली ती निळी बाटली आजही लक्षात आहे काही बहाद्दर त्या काळात जिभेवर बोट फिरवून तिकिटांच्या मागे लावताना बघितले.

एखाद्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रकाशित होणे ही मोठी प्रतिष्ठेची बाब मानली जाते. कारण एकदा ते तिकीट टपालाच्या इतिहासात आले की त्या व्यक्तीचे किंवा विषयाचे नाव देशाच्या टपाल स्मृतीचा भाग बनते. टपाल तिकिटासोबत आणखी एक आकर्षण असतेप्रथम दिवस आवरण. एखादे नवीन टपाल तिकीट ज्या दिवशी प्रकाशित होते, त्या दिवशी विशेष लिफाफ्यावर ते तिकीट लावून आणि त्या दिवसाचा विशेष टपाल शिक्का उमटवून तयार केलेले आवरण म्हणजे प्रथम दिवस आवरण. टपाल तिकीट संग्राहकांसाठी त्याला विशेष महत्त्व असते. टपाल म्हणजे फक्त पत्र नव्हे. तार, मनीऑर्डर, टपाल, बचत बँक, जीवन विमा, पार्सल अशा अनेक सेवांनी भारतीय समाजजीवनाशी टपाल खात्याचे नाते जोडले. धावणारा टपालवाहक, घोडे, उंट, रेल्वे, मोटार आणि विमान असा टपाल वाहतुकीचा प्रवासही विलक्षण आहे.

**आणि मग आले स्पीड पोस्ट**

१९८६ मध्ये सुरू झालेल्या स्पीड पोस्टने भारतीय टपाल व्यवस्थेला नवा वेग दिला. आज पत्र किंवा पार्सल कुठे पोहोचले, याचा मागोवा घेता येतो. संगणकीय नोंदणी, भ्रमणध्वनीवर लघुसंदेश, एकवेळचा संकेतांक, ऑनलाइन सेवा अशा सुविधांमुळे टपाल व्यवस्था काळानुसार बदलत गेली. पण गंमत अशी की, डिजिटल युगातही हाताने लिहिलेल्या पोस्टकार्डची ओढ संपलेली नाही गावाच्या डोंगरावर क्रिकेट खेळत असताना तुमच्या गावचा पोस्टमन तुम्हाला शोधत तुमचं खासगी पत्र तुमच्या हातात द्यायला आल्यावर होणारा आनंद काय असतो तज्ज्ञांनाही गुदगुल्या करणारी ही आठवण आहे. सज्जनाचा अ नॉस्टॅल्जिक सोल करणारा हा सारा पसारा आहे. याच भावनेतून जगभर लोकप्रिय झालेली एक आगळीवेगळी चळवळ म्हणजे पोस्टक्रॉसिंग. २००५ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील अनोळखी व्यक्तीला पोस्टकार्ड पाठवायचे आणि बदल्यात जगातील दुसऱ्या कोणत्या तरी कोपऱ्यातून आपल्याला पोस्टकार्ड मिळायचे. इंटरनेटच्या युगात अनोळखी माणसाने हाताने लिहिलेलं पोस्टकार्ड आपल्या घराच्या टपालपेटीत येणे, हीच या उपक्रमाची खरी गंमत!म्हणजेच टपाल संपलेले नाही; त्याने फक्त आपले रूप बदलले आहे. कधीकाळी संदेश पोहोचवण्यासाठी माणूस मैलोन्मैल धावत होता. आज काही क्षणांत संदेश जगाच्या दुसऱ्या टोकाला पोहोचतो. पण काही गोष्टींना वेगाची गरज नसते. काही भावना पोहोचण्यासाठी वेळ लागतो आणि म्हणूनच त्या अधिक मौल्यवान असतात. म्हणूनच आज जागतिक टपाल दिनानिमित्त एक छोटासा प्रयोग करूया. तुम्ही, मी सारेच पुन्हा तो कालावधी आठवूया! चला, पोस्टकार्डच्या आजूबाजूला लिहिलेला मजकूर, आंतरदेशीय पत्राच्या आत सुरक्षित कोंबलेला मजकूर आणि लिफाफ्याच्या आत अंतराच्या सुगंधात भिजवलेल्या कागदावर मनाच्या शब्दांचे अक्षर करून गोंदलेला तो मजकूर आठवूया तो सध्या काय करत असेल ती सध्या काय करत असेल लिखे जो ख़त तुझे, जो तेरी याद में पुन्हा करूया. बस, एक पोस्टकार्ड घ्या. पेन हातात घ्या. आपल्या अक्षरांमध्ये आपलं मन उमटू द्या. एखाद्या जुन्या मित्राला, मैत्रिणीला किंवा आपल्या आयुष्यात खास असलेल्या व्यक्तीला लिहा

**तू माझ्या आयुष्यात खास आहेस**
**आणि ते पोस्टकार्ड टपालपेटीत टाका.**

ज्या पिढीने टपालाचे सुवर्णयुग पाहिले आहे, त्या पिढीने पुन्हा एकदा पत्र लिहावे. कारण अक्षरांमध्ये फक्त शब्द नसतात भावनांचा सुगंध असतो मी आठवणार आहे, तुम्हीही आठवा चला, पुन्हा एक पत्र लिहूया! आज जागतिक टपाल दिन साजरा करूया!!

# केंद्रीय पथकाला विभागीय आयुक्तांकडून दुष्काळी परिस्थितीचे सादरीकरण

## पावसाची ३५ टक्के तूट;धरणसाठा ३०.७ टक्क्यांवर,पिके व पिण्याच्या पाण्यावर संकट

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी-मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्र शासनाच्या केंद्रीय पथकाला विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागीय आयुक्तालयात विभागातील दुष्काळी परिस्थितीचे सविस्तर सादरीकरण केले. यावेळी पर्जन्यमान, पावसातील खंड, खरीप पिकांची स्थिती, पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, धरणांतील पाणीसाठा, चारा तसेच उपग्रहाधारित पीक स्थिती निर्देशांकांची माहिती पथकासमोर मांडण्यात आली.

कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश आहे. याप्रसंगी राज्याच्या कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग हेही उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर विभागात ८ जिल्हे व ७६ तालुके असून, खरीप हंगामातील पेरणी जवळपास १०० टक्के म्हणजे सुमारे ५२ लाख हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. मात्र, रब्बी हंगामाची पेरणी आतापर्यंत केवळ ६ हजार ८०० हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. विभागात सरासरीच्या तुलनेत सुमारे ३५ टक्के पावसाची तूट असून, आतापर्यंत सरासरीच्या ६५.३५ टक्के पाऊस झाला आहे. जूनमध्ये समाधानकारक पाऊस झाल्यानंतर जुलै, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये पावसाचे प्रमाण घटले. विशेषतः ऑगस्टमधील दीर्घ पावसाच्या खंडाचा पिकांवर परिणाम झाला. विभागातील ४९६ महसूल मंडळांपैकी ३७ मंडळांत ३० दिवसांपेक्षा अधिक, तर १५५ मंडळांत २१ ते ३० दिवसांचा पावसाचा खंड नोंदविण्यात आला आहे.एकूण खरीप पेरणी क्षेत्रापैकी सुमारे ५६ टक्के क्षेत्रावर सोयाबीनची लागवड झाली आहे. पावसाअभावी कापसाची वाढ खुंटून पाते व फुले गळण्याचे प्रमाण वाढले असून, किडींचाही प्रादुर्भाव दिसून आला आहे. सोयाबीनच्या शेंगांमध्ये दाणे भरण्याचे प्रमाण कमी झाले असून, मका, बाजरी व उडीद या पिकांवरही परिणाम झाला आहे. जालना जिल्ह्यातील पीक कापणी प्रयोगांतून उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा अधिक घट झाल्याचे निदर्शनास आले.विभागातील धरणांमध्ये सध्या केवळ ३०.७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पुढील वर्षी ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी पाणीसाठा राखून ठेवण्याची आवश्यकता असल्याने यंदाच्या रब्बी हंगामातील पेरणीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. नांदेड व हिंगोली वगळता जालना, धाराशिव व लातूर जिल्ह्यांमध्ये भूजल पातळी मागील पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा ४ ते ५ मीटरने खाली गेल्याची माहिती देण्यात आली. पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेता, पावसाची २० टक्क्यांपेक्षा अधिक तूट व भूजल पातळीत ३ मीटरपेक्षा अधिक घट झालेल्या भागांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. सध्या १९० गावे व १५७ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून, ६०३ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. संभाव्य टंचाईसाठी ५ हजार १३६ टँकर व ६ हजार ९६० विहिरींचे नियोजन करण्यात आले आहे. पशुधनासाठी सध्या १२१ दिवसांचा चारा उपलब्ध असून, संभाव्य चाराटंचाईच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.पीक व पाण्याच्या स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी उपग्रहाधारित वनस्पती स्थिती निर्देशांक, पाण्याची उपलब्धता दर्शविणारा निर्देशांक आणि वनस्पती स्थिती निर्देशांक यांचाही आढावा घेण्यात आला. पाण्याची उपलब्धता दर्शविणाऱ्या निर्देशांकानुसार ३४ तालुके तीव्र व मध्यम श्रेणीत, तर वनस्पती स्थिती निर्देशांकानुसार १० तालुके तीव्र आणि ३४ तालुके मध्यम श्रेणीत असल्याचे सादरीकरणात नमूद करण्यात आले. पिके वरून हिरवी दिसत असली तरी पावसातील दीर्घ खंडामुळे प्रत्यक्ष वाढ व उत्पादनक्षमतेवर परिणाम झाल्याचे या निर्देशांकांच्या आधारे निदर्शनास आणून देण्यात आले. विभागातील सुमारे ४० लाख शेतकऱ्यांपैकी ६५ टक्के शेतकऱ्यांनी पीक विमा नोंदणी केली असून, पीक परिस्थिती व नुकसानीची माहिती पीक विम्याच्या लाभासाठी उपयुक्त ठरणार आहे.बैठकीच्या शेवटी केंद्रीय पथकाचे प्रमुख तथा कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांनी राज्याकडून सादर करण्यात आलेल्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करून त्याआधारे अहवाल सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले. दुष्काळाची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा, पिकांचे नुकसान तसेच भविष्यातील पाणी व चाऱ्याची गरज यांचा समावेश असलेला सर्वंकष, अचूक व वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच चारा छावण्या, पिण्याचे पाणी आणि रोजगार हमीच्या कामांबाबतची माहिती आवश्यक पुराव्यांसह सादर करून दुष्काळग्रस्त गावांना वेळेत मदत मिळण्यासाठी कार्यवाही करण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विभागीय आयुक्तालयात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., सहआयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे, पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त, भूवैज्ञानिक सोहम दळवी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्यप्रणाली द्वारे विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी सहभागी झाले होते.




सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# डांबरी रस्त्याची झाली मुरमाड वाट;बोधडी-पार्डी रस्त्याला वाली कोण?

## आ.भीमराव केराम यांनी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी



किनवट/प्रतिनिधी-बोधडी बु. मार्गे बोधडी खुर्द ते पार्डी खुर्द जाणारा एकमेव प्रमुख डांबरीकरण केलेला रस्ता आता मुरमाडी बनला आहे. जिल्हा परिषद बांधकाम कार्यालय उपविभाग किनवटच्या अनागोंदी कारभाराचा कळस म्हणजे रस्त्याचे स्वरूप बदलत चालले आहे. या परिसरावर भाजपाच्या डझनभर वजनदार पुढाऱ्यांचे प्रभुत्व असतानासुद्धा रस्त्याची ही भयावह अवस्था का व्हावी ? असा प्रश्न निर्माण होतो. आता विकासप्रेमी आमदार भीमराव केराम यांनी या रस्त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची नितांत आवश्यकता असल्याच्या लोकप्रतिक्रीया उमटवला सुरुवात झाली आहे.

बोधडी बु. जिल्हा परिषद गटातील बोधडी बु., बोधडी खुर्द, पार्डी खुर्द, येन्दा-पेन्दा, नागसवाडी, कोपरा तसेच विदर्भातील गाडी, बोरी, थेरडी अशा अनेक गावांची आर्थिक उलाढालीच्या व्यवहाराची नाळ बोधडी बु. मार्केटशी जोडलेली आहे. शेती उत्पादीत अन्न धान्याच्या वाहतूकीसाठी हाच तो एकमेव प्रमुख मार्ग आहे. सन १९७२ च्या दुष्काळाच्या आसपास या कच्चा रस्त्याची बांधणी झाल्याचे समजते. कालांतराने मजबुतीकरण आणि बारबार डांबरीकरण करण्यात आले. अलीकडच्या काळात तकलादू डांबरीकरणाची गुंडाळपट्टी केल्याने रस्त्याची वयोमर्यादा आता एक एक वर्षापर्यंत येऊन ठेपली आहे. काम केलेल्या एजन्सीच्या गुणदोषाकडे न पहाता किमान जिल्हा परिषद बांधकाम विभागाने नैतिकमुल्यांच्या जाणीवेतून आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता असल्याच्या संतापजनक लोकप्रतिक्रीया उमटवला लागल्या आहेत. बरीकरणाच्या मजबूत रस्त्यावरचे डांबरीकरण नेस्तनाबूत झाले असून चक्क मुरुमाचा थर देऊन मुरमाडी रस्ता करण्यात आला आहे. तो पण धड नाही. रस्त्यात खड्डेचखड्डे पडल्यामुळे त्या रस्त्याला मागील चार दोन वर्षांपासून कोणीही वाली राहिलेला नाही. परिसरातील तमाम नागरिकांनी ओरड केली परंतु कोणीही ऐकायला तयार नाही. येणाऱ्या महाशिवरात्री पुर्वी आमदार भीमराव केराम यांनी या मार्गाच्या डांबरीकरणासाठी विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करावा. पेन्दा/नागढव येथील नागनाथदेवाच्या यात्रेसाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या भावना लक्षात घेऊन दर्जेदार रस्ते करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### डीझेल चोरी करणाऱ्या दोन जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-वेगवेगळ्या वाहनामधून डिझेल चोरी करणाऱ्या दोन जणांना सोनखेड पोलीसांनी अटक केली आहे.

मुद्दसीर साजीद शेख (वय २२), मुजाहिद वहिद शेख (वय २४) रा.सोनखेड हे दोघे जण सोनखेड ओव्हर ब्रीज जवळ उभ्या असलेल्या वेगवेगळ्या वाहनांतून डिझेल चोरी करीत असतांना गुरुवारी रात्री पोलीसांनी अटक केली. त्यांच्याजवळून २० लिटर डिझेल, तीन कॅन व एक कार असा अडीच लाखाचा ऐवज जप्त केला आहे.

# दिवाळीपूर्वी फटाका विक्रेत्यांची संयुक्त बैठक घ्या-गोपाल सारडा

हदगाव/प्रतिनिधी-दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर हदगाव व हिमायतनगर तालुक्यांतील फटाका विक्री सुरू होण्यापूर्वी प्रशासनाने सर्व फटाका विक्रेत्यांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करावी, अशी मागणी शिवसेना गटनेते तथा नगरसेवक गोपाल मदनलाल सारडा यांनी उपविभागीय अधिकारी, हदगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. फटाका विक्रीसाठी आवश्यक परवानग्या, शासनाचे नियम आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत या बैठकीत ठोस निर्णय घेण्यात यावेत, असेही त्यांनी नमूद केले आहे.

दोन दिवसांपूर्वी हिंगोली येथे घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर दिवाळीच्या काळात नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने वेळीच खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे सारडा यांनी निवेदनात म्हटले आहे. फटाका विक्रीसाठी परवाने देताना तसेच विक्रीच्या ठिकाणी आवश्यक नियम व अटींचे पालन करताना काही अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रशासन आणि फटाका विक्रेते यांच्यात समन्वय साधून नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी हदगाव व हिमायतनगर तालुक्यांतील सर्व फटाका विक्रेत्यांची संयुक्त बैठक लवकरात लवकर घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी, हदगाव व हिमायतनगरचे तहसीलदार, दोन्ही नगरपरिषदांचे मुख्याधिकारी तसेच दोन्ही तालुक्यांतील पोलीस निरीक्षक उपस्थित राहावेत, अशी सूचनाही निवेदनातून करण्यात आली आहे. बैठकीत फटाका विक्रेत्यांच्या अडचणी समजून घेऊन विक्रीसाठी आवश्यक परवानग्या, शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन, सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेण्यात यावेत, अशी अपेक्षा सारडा यांनी व्यक्त केली आहे. दिवाळीच्या काळात फटाका विक्रीच्या ठिकाणी नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असते. अशा वेळी आग किंवा अन्य दुर्घटना घडू नयेत, यासाठी विक्रीची ठिकाणे, सुरक्षित अंतर, अग्निसुरक्षेची साधने आणि आपत्कालीन उपाययोजनांबाबत प्रशासनाने आधीच नियोजन करणे आवश्यक आहे. फटाका विक्रेत्यांना नियमांची स्पष्ट माहिती देऊन सुरक्षित पद्धतीने व्यवसाय करण्यासाठी मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

# लांजी शाळेतील शैक्षणिक सुविधांवर उपसंचालक दीपक चवणे यांच्याकडून समाधान

माहूर/प्रतिनिधी-शिक्षण हे व्यक्तीच्या प्रगतीचे आणि समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे विद्यार्जन करून मोठ्या संख्येने शासकीय सेवेत तसेच सार्वजनिक जीवनात सहभागी व्हावे आणि स्वतःच्या प्रगतीसोबतच समाजपरिवर्तनातही योगदान द्यावे,असे आवाहन लातूर विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी केले.

शिक्षण विभागामार्फत ५ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या चला शाळेत जाऊया अभियानांतर्गत दि.९ ऑक्टोबर रोजी लांजी येथील जिल्हा परिषद शाळेला त्यांनी भेट देऊन शैक्षणिक व भौतिक सुविधांची पाहणी केली. यावेळी डायट नांदेडचे प्राचार्य डॉ. अमोल निळेकर, शिक्षणाधिकारी (योजना) दिलीपराव बनसोडे, गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पाचंगे आणि केंद्रप्रमुख डॉ. अरुण धकाते उपस्थित होते. सकाळी ९.३० वाजता शाळेत दाखल झालेल्या पथकाने परिपाठानंतर प्रत्यक्ष वर्गातील अध्यापन प्रक्रियेचे निरीक्षण केले. तसेच शाळेतील भौतिक सुविधा, परिसर स्वच्छता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता आणि शालेय पोषण आहाराची पाहणी केली. शाळेतील परिपाठाचे सादरीकरण, आकर्षक रंगरंगोटी, स्वच्छ परिसर, परसबाग, सीसीटीव्ही कॅमेरे, सौरऊर्जा यंत्रणा, वाय-फाय सुविधा, शुद्ध पेयजल, स्वच्छतागृहे, मेन्यूनुसार दिला जाणारा पोषण आहार, क्रीडासाहित्य तसेच विद्यार्थ्यांचा अध्यापनातील सहभाग या बाबींची पथकाने दखल घेत समाधान व्यक्त केले. यावेळी सरपंच मारोती रेकुलवार, सोनुताई विनोद पवार, रेणुकादास वल्लेपवार, राजू पवार, संतोष कोपुलवार, मुख्याध्यापक अरविंद जाधव, व इतर उपस्थित होते.

# गुरुवचनातून गांधी-शास्त्रींच्या विचारांचा जागर;पीपल्स हायस्कूलमध्ये जयंती उत्साहात



नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पीपल्स हायस्कूलच्या प्राथमिक विभागाच्या वतीने ६ ऑक्टोबर रोजी सकाळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि अनेकांच्या जीवनाला दिशा देणाऱ्या सौ. शामल बोराळकर यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीपल्स हायस्कूल शालेय समितीचे अध्यक्ष तथा सौ.शामल बोराळकर यांचे कृतज्ञ आणि प्रामाणिक शिष्य स. नौनिहालसिंघ जहागिरदार होते. महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा धांडोळा घेताना बोराळकर यांनी केवळ इतिहासातील दोन महान व्यक्तिमत्त्वांची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडली नाही, तर त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीच्या जीवनाशी असलेला जिवंत संबंध प्रभावीपणे उलगडून दाखविला. साधेपणा, सत्य, अहिंसा, स्वावलंबन, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि देशसेवा या मूल्यांची उजळणी करताना त्यांनी गांधीजी आणि शास्त्रीजींच्या जीवनातील अनेक आठवणी अत्यंत प्रभावी शब्दांत विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. त्यांच्या प्रत्येक शब्दातून संस्कारांची ऊब, विचारांची प्रगल्भता आणि जीवनमूल्यांची जाण विद्यार्थ्यांना अनुभवता आली. अनेक पिढ्यांना घडविणाऱ्या या ज्येष्ठ व्यक्तिमत्त्वाचे विचार ऐकताना विद्यार्थ्यांसह व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांनीही गुरुचे वचन ऐकण्याची आगळी अनुभूती घेतली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स. नौनिहालसिंघ जहागिरदार यांनी यांनी आपल्या गुरूंचे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून कार्यक्रमाचा समारोप केला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, श्री.टेकाळे, शिक्षक पेद्दे, कदम, मुख्याध्यापिका सोनाली केंद्रे, सहशिक्षिका प्रिया मुंडे, प्रिया पवार, साखरे, तसेच हटकर यांची उपस्थिती होती.

# ज्ञानेशकुमार विरोधात काँग्रेसचे आंदोलन

मुदखेड/प्रतिनिधी-मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी पदाचा गैरवापर केल्याचा आरोप इंडिया महाविकास आघाडीने केला असून. या कथित गैर प्रकाराच्या निषेधार्थ देशभर आंदोलन करण्यात येत असून दडपण्यासाठी भाजप प्रणित केंद्र सरकारने दडपण्यासाठी झुंडशाहीचा वापर सुरू केला आहे. या विरोधात काँग्रेसने काळ्याफिती लावून निषेध व्यक्त केला.

मुदखेड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने दि.८ (गुरुवार) काळा दिवस पाळण्यात आला आहे. बाळासाहेब ठाकरे चौकात काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन हाताला काळ्याफिती बांधून. केंद्र सरकारच्या विरोधात निषेध नोंदविला आहे. यावेळी वोट चोर गद्दी छोड, ज्ञानेश कुमार हटाव देश बचाव, अशा घोषणा देण्यात आल्या. इंडिया महाविकास आघाडीच्या वतीने दिल्ली सह देशभरात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलना दरम्यान विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खा.राहुल गांधी यांना जबरदस्तीने अटक करून आंदोलन दडपण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला जात आहे. भाजप सरकार कायदा व लोकशाही मूल्यांची पायमल्ली करत असल्याचा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी यावेळेस केला आहे. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, गिरीश कोतावर, गंगाधर पाटील मगरे, करीम खानसाब, नगरसेवक अविनाश चौदंते, कादिर भाई, प्रशांत पाटील मुंगल, मुजीब पठाण, तेजाब पाटील मुंगल, मोईन फूलवाले, वेदांत शेवटे, शिवानंद देवके, शेख अनिस, महेश पवार, बालाजी सूर्यवंशी, नंदकिशोर पवार, हनुमान लखे, संजय बोकेफोड, सतीश व्यवहारे, शरद पवार, विठ्ठल आचार्य यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायालय,क.स्तर कंधार
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३६७/२०२६
(CNR No.MHND10-001269-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रहिमुन्नीसा शेख भ्र.युसूफ शेख काझीगल्ली कंधार ता.कंधार जि.नांदेड | वय-८० वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | पठाण गुलाम हैदर पि.मोहम्मद युसुफ काझीगल्ली कंधार ता.कंधार जि.नांदेड | वय-६३ वर्षे | धंदा-पेन्शनर |
| ३ | गौसिया बेगम भ्र.शेख मगदुम नवरंगपुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड | वय-६० वर्षे | धंदा-घरकाम |
| ४ | आशा बेगम भ्र.शौकत अली चौफाळा इतवारा,नांदेड | वय-५८ वर्षे | धंदा-घरकाम |
| ५ | कुरेशा बेगम भ्र.शेख अहेमद हिलालनगर देगलुर नाका नांदेड ता.जि.नांदेड | वय-५५ वर्षे | धंदा-घरकाम |
| ६ | गुलाम शहिंदर पि.मोहममद युसुफ शिवाजीनगर नांदेड ता.जि.नांदेड | वय-५४ वर्षे | धंदा-व्यापार |
| ७ | मोहम्मद सिकंदर पि.मोहम्मद युसुफ काझीगल्ली कंधार जि.नांदेड | वय-५० वर्षे | धंदा-व्यापार |
| ८ | मो.सुरैय्या बेगम पि.युसुफ लोहा ता.लोहा जि.नांदेड | वय-४८ वर्षे | धंदा-घरकाम |
| ९ | सादिया बेगम भ्र.जिलानी शेख अहमदपूर ता.अहमदपूर जि.लातूर | वय-४७ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार - शाखाधिकारी
स्टेट बँक ऑफ हैद्राबाद (पुर्वीची)
स्टेट बँक ऑफ इंडिया (आताची) शाखा कंधार ता.कंधार

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ९ चे वडिल नामे मोहम्मद युसुफ गुलाम सरवर हे होते ते दिनांक १४/०८/२००८ रोजी मयत झाले आहेत. मयत मोहम्मद युसुफ गुलाम सरवर यांची पत्नी नामे सलीमाबी भ्र.मोहम्मद युसुफ ही होती ती यापुर्वीच मयत झाली आहे. मयत मोहम्मद युसुफ गुलाम सरवर यांनी सलीमाबी भ्र.मोहम्मद युसुफ मयत झाल्यानंतर अर्जदार क्र.१ यांच्याशी लग्न केले आहे. अर्जदार क्र.२ ते ९ हे मयत मोहम्मद युसुफ गुलाम सरवर यांच्या पहिल्या पत्नीचे अपत्य आहेत. गैरअर्जदार बँकेमध्ये मयत मोहम्मद युसुफ गुलाम सरवर यांचे बचत खाते क्र.६२०६५३३९९३४ मधील शॉर्ट टर्म डिपॉजिट नं.४३५२१५ दिनांक २४/०८/२००८ रोजी रक्कम रुपये ४०,०००/- व खाते क्र.३२०६५३४०२३६ मधील शॉर्ट टर्म डिपॉजिट रिसीप्ट नं.४३५२१६ मध्ये रक्कम रुपये ४०,०००/- अशी एकुण ८०,०००/- रुपये जमा आहे. अर्जदार यांचे म्हणणे आहे की, मयत मोहम्मद युसुफ गुलाम सरवर यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत मोहम्मद युसुफ गुलाम सरवर यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत मोहम्मद युसुफ गुलाम सरवर यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२०/११/२०२६

आज रोजी दि.०६/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| | आदेशावरुन |
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक** |
| दिवाणी न्यायालय क.स्तर, कंधार | सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार |

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१३७७/२०२६

१. बालाजी पि.लक्ष्मण कामले, वय ५४ वर्ष धंदा नोकरी रा.अरविंद नगर,नांदेड, २. संजय पि.लक्ष्मण कामले वय ५१ वर्ष धंदा खाजगी नोकरी रा.अरविंदनगर,नांदेड, ३. छाया भ्र.नरसिंगराव बागलीकर वय ५७ वर्ष धंदा घरकाम रा.३-८-५९/ए नागेशवरनगर सदाशिवपेठ मेडक तेलंगना, ४. रमाबाई भ्र.मारोतराव गुमटे वय ६० वर्ष धंदा घरकाम रा.४-१०६८ सराब बाजार रोड अहेमद मंजिल साहेब बाजार गल्ली गुलबर्गा कर्नाटका, ५. उमा भ्र.आनंद हांडे वय ५८ वर्ष धंदा नोकरी रा.५-९-२०७/१०४ यारपाल जवळ मल्लाना मंदिर कॉलनी अलवाल,रंगारेडी तेलंगना

विरुध्द
निल

दावा- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत लक्ष्मण रुक्मण कामले व कलावतीबाई भ्र.लक्ष्मण कामले यांचे वारस आहेत मयत लक्ष्मण रुक्मण कामले व कलावतीबाई भ्र.लक्ष्मण कामले यांचा मृत्यू दिनांक २४/०४/२०११ व १५/०३/२०१४ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २६/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ८/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| ४ थे सह दिवाणी न्यायालय | स.अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

## जाहीर प्रगटन

मा.श्रीमती के.बी.सोनवणे,३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड,
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४९७/२०२६
नीलाबाई पांडुरंग गोवंदे विरुद्ध निरंक

अर्जदार:- १.नीलाबाई पांडुरंग गोवंदे वय : ५१ वर्ष धंदा : घरकाम रा.तरोडा बू.नांदेड, २. राहुल पांडुरंग गोवंदे वय : ३६ वर्षे, धंदा : व्यापार रा.तरोडा बु.नांदेड, ३. अभय पांडुरंग गोवंदे वय : ३६ वर्षे, धंदा : व्यापार रा.तरोडा बु.नांदेड, ४. सूचित भ्र.नागोराव भोकरे जि.पांडुरंग सधोजी गोवंदे वय : ३८ वर्षे, धंदा : घरकाम रा. सिडको, नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार - निल

दावा- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारसहक प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मयत पांडुरंग सधोजी गोवंदे यांचे अर्जदार क्र.१ हे मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ & ३ मुले आहेत आणि ४ हे मयताचे मुलगी आहे. मयत पांडुरंग सधोजी गोवंदे यांचा मृत्यू दिनांक २३/०१/२०२६ रोजी राहत्या घरी नांदेड येथे झाला आहे. अर्जदारांशिवाय मयतांचे कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदार यांनी मयत पांडुरंग सधोजी गोवंदे यांचा वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटण द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील संबधिताना मयतांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत दिवसाच्या आत दिनांक २५/११/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जबाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ८/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| ३ रे सह दि.न्या.,क.स्तर, | स.अधिक्षक |
| नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१३४२/२०२६

१. बालाजी पि.लक्ष्मण कामले, वय ५४ वर्ष धंदा नोकरी रा.अरविंद नगर,नांदेड, २. माधवी पि.बालाजी कामले वय २८ वर्ष धंदा घरकाम रा.अरविंदनगर नांदेड, ३. अभिषेक पि.बालाजी कामले वय २७ वर्ष धंदा शिक्षण रा.अरविंदनगर नांदेड, ४. मनिषा भ्र.निरज ओझा वय २६ वर्ष धंदा घरकाम रा.नारायणनगर नांदेड, ५. अनिकेत पि.बालाजी कामले वय २४ वर्ष धंदा शिक्षण रा.अरविंदनगर नांदेड

विरुध्द
निल

दावा- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत नैना भ्र.बालाजी कामले यांचे वारस आहेत मयत नैना भ्र.बालाजी कामले यांचा मृत्यू दिनांक २२/०३/२०२२ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २८/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ८/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| ४ थे सह दिवाणी न्यायालय | स.अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# एमपीएससीच्या १५ विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल

पुणे:मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मागण्या मान्य झाल्यानंतर आंदोलन स्थगित केल्याचे लेखी पत्र दिले असतानाही सार्वजनिक रस्त्यावर आंदोलन केल्याप्रकरणी पुण्यातील विश्रामबाग पोलिसांनी एमपीएससीच्या १५ आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल केला आहे. नवी पेठेतील इंदुलाल कॉम्प्लेक्ससमोर १ ऑक्टोबर रोजी झालेल्या आंदोलनामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याचा आणि प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. या प्रकरणात आमदार रोहित पवार यांचे नाव आरोपींच्या यादीत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थी प्रतिनिधी प्रमोद पाटील आणि अन्य विद्यार्थ्यांनी आंदोलनासाठी परवानगी मिळावी, यासाठी २५ सप्टेंबर रोजी पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात निवेदन दिले होते. अलका टॉकीज चौक, अहिल्या अभ्यासिका आणि एस. एम. जोशी पूल या तीन ठिकाणी आंदोलन करण्याचे पर्याय देण्यात आले होते.

# ग्रामसभेला दांडी,चौकशीलाही ठेंगा; बोधडी ग्रामपंचायत अधिकाऱ्याला ४८ तासांचा अल्टिमेटम

## बँक व्यवहारांचीही तपासणी;अभिलेख न दिल्यास शिस्तभंगाच्या कारवाईचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-ग्राम पंचायत अधिकाऱ्याच्या दांडीबहाद्दरपणामुळे बोधडी बु. ग्रामपंचायत तुर्तास तरी बहूचर्चीत झाली आहे. अत्यावश्यक असलेल्या १५ ऑगस्टच्या सार्वभौम ग्रामसभेला दांडी मारल्यानंतर आता पुन्हा एकदा त्याची पुनरावृत्ती करून गटविकास अधिकाऱ्यांच्या चौकशी-लाही बिनधास्त बगल देण्यात आली आहे.

गटविकास अधिकाऱ्यांनी ग्राम पंचायत अधिकाऱ्याला ४८ तासाचा अल्टिमेट दिला असून तक्रारीशी संबंधित सर्व अभिलेखे उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. ग्राम पंचायत अधिकारी यातून आतातरी बोध घेणार की, ४८ तासाच्या अल्टिमेटमलाही दांडी मारण्याच्या हॅट्रीकचा विक्रम पूर्ण करणार ? याकडे नागरिकांसह पंचायत समिती प्रशासनाचे लक्ष वेधून स्वाभाविक बनले आहे.

बोधडी बु.ग्रामपंचायतीच्या बँक खात्यांतील व्यवहारांचीही तपासणी केली जाणार आहे. पंचायत समिती किनवटच्या गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांनी ८ ऑक्टोबर रोजी आयसीआयसीआय बँक वजिराबाद नांदेड, स्टेट बँक ऑफ इंडिया किनवट आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक बोथडी बु. येथील शाखा व्यवस्थापकांना पत्र देऊन १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीतील ग्राम-पंचायतीच्या बँक खात्यांचे विवरण मागविले आहे. बोधडी बु. ग्रामपंचायतीला विविध विकास योजनांतून प्राप्त झालेले अनुदान रक्कम आणि त्यातून झालेल्या खर्चाची खातेनिहाय चौकशी करण्यासाठी ही माहिती आवश्यक असल्याचे गटविकास अधिकाऱ्यांनी पत्रात नमूद केले आहे.ग्रामनिधी, पंधरावा वित्त आयोग तसेच इतर योजनांशी संबंधित खात्यांच्या व्यवहारांची तपासणी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राम पंचायतीच्या निधीच्या प्रत्यक्ष वापराबाबत आता बँक व्यवहारांच्या माध्यमातूनही शहानिशा होणार आहे. दरम्यान, बोधडी बु. येथील तक्रारकर्त्या शिष्टमंडळाच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी ग्रामपंचायतीचे मूळ अभिलेख घेऊन उपस्थित राहण्याच्या सूचना ग्राम पंचायत अधिकारी प्रेमानंद बापूराव सिरसेवाड यांना देऊनही ते ८ ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयात अनुपस्थित राहिल्याचे पत्रात नमूद आहे. दस्तूरखुद्द गटविकास अधिकाऱ्यांच्या चौकशीत मूळ अभिलेख उपलब्ध करून दिले नाही ना हजरही राहिले नसल्यामुळे चौकशी न करता गटविकास अधिकाऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. ग्रामसेवक सिरसेवाड यांना नोटीस बजावून ४८ तासांच्या आत तक्रारीशी संबंधित ग्रामपंचायतीचे आवश्यक मूळ अभिलेख उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निर्धारित मुदतीत अभिलेख उपलब्ध करून न दिल्यास तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड यांच्याकडे सादर करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नोटीसमधून देण्यात आला आहे.

# शिवरत्न जिवाजी महाले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची काँग्रेसची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-छत्रपती शिवाजी महाराजांचे शुरशिलेदार शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शिवरत्न जिवाजी महाले यांचा पुर्णाकृती पुतळा नवीन कौठा येथे उभारण्यात यावा अशी मागणी शुक्रवार (ता.९) रोजी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

शिवरत्न जिवाजी महाले यांचा नावाने नवीन कौठा येथे महानगरपालिकेचा वतीने अधिकृत चौक असून याठिकाणी पुर्णाकृती पुतळा व्हावा यासाठी २०१२ मधील मनपातील तत्कालीन काँग्रेस महापौर अब्दुल सत्तार व उपमहापौर आनंद चव्हाण यांच्या नेतृत्वात ठराव मंजूर करण्यात आला होता. दरम्यान मनपा निवडणूक २०२६ मध्ये काँग्रेस वंचित आघाडीने जाहिरनामात देखील पुतळा उभारण्यासाठी संकल्प नमूद केला होता. दरम्यान या पुतळा संदर्भात पाठपुरावा करण्याची विनंती सिडको ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी केली होती. दरम्यान जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष तथा माजी उपमहापौर अब्दुल गफ्फार यांच्या उपस्थितीत शहर व



जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शिवरत्न जिवाजी महाले यांचा पुर्णाकृती पुतळा नवीन कौठा येथे उभारण्यात यावा अशी मागणी आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी माजी उपमहापौर आनंद चव्हाण, प्रदेश सरचिटणीस डॉ.रेखाताई चव्हाण, नगरसेवक सय्यद शोएब, मुन्ना अब्बास हुसैन, पाशा शेख, सत्यपाल सावंत, सुरेश हटकर, फेरोज खोकेवाले, ॲड. शहबाज,बापूसाहेब पाटील, दीपक सिंग हुजारिया, मुन्ना देशमुख तरोडेकर, सय्यद रिहान, अंबादास रातोळे आदी उपस्थित होते.



पाथरड ते देगाव रोडवर गुरुवारी रात्री अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा बारड पोलीसांनी पकडला असून या प्रकरणी हायवा चालकास अटक करण्यात आली आहे.

# चिन्मय व्यंकटेश मंदिर आयोजित दसरा ब्रम्होत्सव

नांदेड/प्रतिनिधी-येथील चिन्मय व्यंकटेश मंदिर, कॅनॉल रोड, ई-स्क्वेअरजवळ च्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणेच याहीवर्षी चिन्मय व्यंकटेशाचा अकरावा दसरा ब्रम्होत्सव सोहळा दि. ११ ते २० ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

चिन्मय मिशन आचार्य प.पू. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती व पुरोहित रोहित मोहरील यांच्या मार्गदर्शनात नित्य पूजन, होम हवन, कल्याण उत्सव, देवी भागवत, सुप्रभात अभिषेक, वाहन रथोत्सव, आरती, तीर्थप्रसाद आणि गंगाळ महाप्रसाद सेवा संपन्न होणार आहे. तसेच चिन्मय व्यंकटेश मंदिराच्या एकादश दसरा ब्रम्होत्सवानिमित्त दि. १२ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत दुपारी २ ते ५.३० या वेळेत प.पू. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांच्या अमृतवाणीतून श्रीमद् देवी भगावत कथा होणार आहे.तरी भाविक बंधू-भगिनींनी दर्शनाचा, श्रवणाचा व ब्रम्होत्सव सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष भीमराव रामीनवार, सचिव अनंत करडखेडकर, कोषाध्यक्ष सुभाष व्यवहारे आणि कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

# पीपल्स हायस्कूलच्या दोन विद्यार्थ्यांना कॅडेट वेल्फेअर शिष्यवृत्ती मंजूर

नांदेड/प्रतिनिधी-पीपल्स हायस्कूल येथील विद्यार्थिनी दर्शनी सुप्रिया नारायण आणि विद्यार्थी अहिरे गोविंद दत्ताहारी यांना कॅडेट वेल्फेअर शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. उत्कृष्ट गुणवत्ता, शिस्त व शैक्षणिक कामगिरीबद्दल दोघांची या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली असून, त्यांना प्रत्येकी सहा हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले.




नवी दिल्ली येथील डीजी एनसीसीअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेतून देशभरातील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत दिली जाते. ५२ महाराष्ट्र बटालियन, नांदेड येथे कर्नल गुरमिंदर सिंग, ॲडम अधिकारी कर्नल श्रीश बहुगुणा आणि एस. एम. मोहानसिंग यांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील, उपाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल अग्रवाल, सचिव प्रा. शामल पाटकी, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, पीपल्स हायस्कूल शालेय समितीचे अध्यक्ष स.नौनीहालसिंग जहागिरदार, मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, अरविंद काळे, राहुल गोरे, एनसीसीचे इंचार्ज टेळकळे, श्रीराम गाडेकर, एनसीसी अधिकारी कदम एस. जे. यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३६९/२०२६
(CNR No.MHND10-00-2026)

अर्जदार -

१ बेबी बेगम भ्र.शेख मन्नू वय-४९ वर्षे धंदा-घरकाम
फकिरपुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड
२ आफरीन बेगम भ्र.शेख करीम वय-३३ वर्षे धंदा-घरकाम
पीरपऱ्हान कंधार ता.कंधार जि.नांदेड
३ आरशाद पि.मन्नू शेख वय-३० वर्षे धंदा-व्यापार
फकिरपुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड
४ अंजुम बेगम भ्र.दावल पठाण वय-२८ वर्षे धंदा-घरकाम
हताईपुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड
५ शेख शाकीर पि.शेख मन्नू वय-२७ वर्षे धंदा-व्यापार
दरगापुरा,कंधार ता.कंधार जि.नांदेड
६ उजमा बेगम पि.शेख मन्नू वय-२३ वर्षे धंदा-घरकाम
दरगापुरा,कंधार ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ६ चे वडिल नामे शेख मन्नु शेख महेमूद हे होते ते दिनांक २४/०८/२०२६ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार १ ची सासु व अर्जदार क्र.२ ते ६ यांची आजी नामे फातेमा बेगम शेख महेमूद यापुर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, शेख मन्नु शेख महेमूद यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख मन्नु शेख महेमूद यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख मन्नु शेख महेमूद यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२०/११/२०२६

आज रोजी दि.०६/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३६१/२०२६
(CNR No.MHND10-001263-2026)

अर्जदार -

१ शेख गुलाम रसूल पि.महेबुब वय-७३ वर्षे धंदा-घरकाम
२ अलाउद्दीन शेख पि.महेबुब साब शेख वय-५७ वर्षे धंदा-घरकाम
३ शेख अजिमोद्दीन पि.शेख महेबुब वय-५५ वर्षे धंदा-व्यापार
४ शेख नाईमोद्दीन पि.शेख महेबुब वय-४९ वर्षे धंदा-घरकाम
५ शमशोदीन पि.शेख महेबुब वय-४७ वर्षे धंदा-व्यापार
६ शेख मैनोदिन शेख महेबुब वय-४५ वर्षे धंदा-घरकाम
७ शेख सुलतान पि.महेबुब वय-४४ वर्षे धंदा-घरकाम
अर्जदार क्र.१ ते ७ हे सर्व रा.
सुलतानपुरा, ता.कंधार जि.नांदेड
८ सुलतानाबी भ्र.माईन घरकाम वय-४७ वर्षे धंदा-घरकाम
रा.मुखेड ता.मुखेड जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ८ चे वडिल नामे शेख महेबुब रक्मोदीन हे होते ते दिनांक २८/०९/२०१० रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार १ ते ८ ची आई आमिनाबी शेख रक्मोदीन ही ती यापुर्वीच मयत झाली. तसेच अर्जदार क्र.१ ते ८ यांची आजी नामे सुगराबी रक्मोदीन यापुर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, शेख महेबुब रक्मोदीन यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख महेबुब रक्मोदीन यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख महेबुब रक्मोदीन यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१८/११/२०२६

आज रोजी दि.०६/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

# यवतमाळ जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील एका उमेदवाराच्या पात्रतेचा मुद्दा निर्णायक वळणावर

उमरखेड/प्रतिनिधी-यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीतील एका उमेदवाराच्या पात्रतेचा मुद्दा निर्णायक वळणावर आला आहे. सलग दहा वर्षांपेक्षा जास्त काळ संचालकपद भूषविल्याच्या आक्षेपावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आरबीआयला निर्देश दिले आहेत.

न्यायालयाने १ ऑक्टोबर रोजीच्या आदेशात, २२ सप्टेंबर २०२६ रोजी आरबीआयकडे सादर केलेल्या निवेदनावर तीन आठवड्यात निर्णय घेण्यास सांगितले आहे. संबंधित उमेदवाराचा कार्यकाळ- दि.२१ डिसेंबर २००७ ते १० सप्टेंबर २०२० आणि ४ जानेवारी २०२१ ते ३ जानेवारी २०२६, म्हणजे सलग १७ वर्षांहून अधिक आहे. बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ नुसार सहकारी बँकेत संचालकपदाची कमाल मर्यादा दहा वर्षे आहे. यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे हरकत घेण्यात आली होती, मात्र महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार स्वतंत्र तरतूद नाही असे सांगत ती फेटाळण्यात आली. त्यानंतर उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली. न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेत थेट हस्तक्षेप टाळला, पण आरबीआयला कायदेशीर निर्णय घेण्याचे निर्देश दिले. लातूर जिल्हा बँकेत याच दहा वर्षांच्या नियमावरून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह आठ संचालकांवर तक्रार झाली होती. त्यापैकी ७ जणांनी राजीनामे दिले, तर एकाला पदावरून दूर करण्याचे निर्देश आरबीआयने दिले होते. ही कारवाई कलम १०-अ आणि ५६ अंतर्गत झाली. आरबीआयच्या ग्रामीण सहकारी बँक प्रशासन दिशा, २०२५ नुसार, मधला खंड ३ वर्षांपेक्षा कमी असेल तर तो सलग कार्यकाळातच गणला जातो. यावर राम देवसरकर म्हणाले, लातूरमध्ये दहा वर्षांची मर्यादा हा केवळ सैद्धांतिक मुद्दा नसून कारवाईचा विषय आहे हे आरबीआयने सिद्ध केले आहे. कायदा सर्वांसाठी समान असेल तर यवतमाळमध्येही त्याच निकषावर निर्णय अपेक्षित आहे. सहकारातील सर्वच पदे आपल्याकडेच असावीत असा आग्रह योग्य नाही. आरबीआयचा निर्णय आमच्या बाजूने लागेल अशी खात्री आहे.

पान १ वरुन

### मेट्रो-रेल्वे बंद करुन...

प्रवाशांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ शकतो, असा युक्तिवाद त्यांनी केला. सार्वजनिक वाहतूक बंद करून नागरिकांची गैरसोय करणे म्हणजे त्यांच्या नागरी हक्कांवर गदा आणण्यासारखे असल्याचेही वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

सरकारच्या वतीने आंदोलनासाठी कोणीही आयोजक नसल्याचे सांगण्यात आले. मात्र, आंदोलनाच्या संभाव्य परिणामांची जबाबदारी हाताळताना सामान्य नागरिकांच्या प्रवासाचा अधिकार डावलता येणार नाही, हा मुद्दा सुनावणीदरम्यान महत्त्वाचा ठरला.

### शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाणाच्या...

लागले आहे.न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाची बाजू पुढील आठवड्यात मांडली जाणार असून, त्यानंतर उद्धव ठाकरे गटाकडून प्रत्युत्तर दाखल केले जाण्याची शक्यता आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सुनावणी अंतिम टप्प्यात पोहोचू शकते. पश्चिम बंगालमधील मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाशी संबंधित प्रकरणाची सुनावणी लवकर घेण्याची विनंती करण्यात आली असता, शिवसेना प्रकरणाची सुनावणी ३० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे न्यायालयाने सांगितल्याचे वृत्त आहे.

### भारतीय वंशाच्या नवी पिल्लै यांना...

करणाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत आणण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा या पुरस्काराच्या माध्यमातून गौरव करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४